पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक २२**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २८/८/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ९६१**

मा.सौ.चाँदबी नदाफ, मा.सौ.राजश्री काळे व मा.सौ.वैशाली मराठे यांचे दि.१६/८/२०१८ चे पत्र.

बांधकाम विभाग पुणे महानगरपालिका यांचा नकारात्मक अभिप्राय इमारतीच्या साईड व फ्रंट मार्जिन, टेरेसवर जाहिरात फलक परवानगी व नूतनीकरण दिल्याचे निदर्शनास येत असून ही बाब विकास नियंत्रण नियमावली, जाहिरात व फलक नियमावली २००३ व महाराष्ट्र महापालिका अधिनियम यांचे स्पष्टपणे उल्लंघन करणारी आहे. तसेच मे.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे अवमान करणारी आहे. पुणे महानगरपालिकेचे थकबाकीदार जाहिरात फलक धारक व कर आकारणी कर संकलन विभागाची थकबाकी असलेल्या जागेवर जाहिरात फलक परवानगी देत आहे. हेच धोरण यापुढे राबवायचे असल्यास इमारतीच्या साईड व फ्रंट मार्जिन, टेरेसवर जाहिरात फलक परवानगी व नूतनीकरण दिल्यास सदर जागेवर व्यावसायिक दराने कर आकारणी करण्यात यावी. यामुळे पुणे महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नात मोठया प्रमाणावर भर पडणार आहे.

महापालिका क्षेत्रात रिकाम्या अथवा बांधलेल्या जागेचा व्यावसायिक वापर होत असल्यास सदर ठिकाणी व्यावसायिक दराने कर आकारणी करणे क्रमप्राप्त आहे. तसेच अवैधरित्या व्यावसायिक वापर झाल्यास तिप्पट दराने कर आकारणी महाराष्ट्र महापालिका अधिनियमान्वये बंधनकारक आहे.

पुणे महानगरपालिकेकडून जाहिरात फलक परवानगी व नूतनीकरण दिलेल्या सर्व जाहिरात फलक धारकांकडून परवानगीच्या दिनांकापासून ते आजपर्यंत व्यावसायिक दराने कर आकारणी करण्यात यावी. सदरचा व्यावसायिक कर भरून त्याची एन.ओ.सी जाहिरात फलक परवानगी व नूतनीकरणास बंधनकारक करावी.

**विषय क्र. ९६२**

मा.सौ.ज्योती गोसावी यांचे दि.१६/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.३४ब,मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.९० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, प्राथमिक शाळेसाठी नवीन इमारत बांधणे, वर्गखोल्या बांधणे, मैदाने विकसित करणे व मुलभुत सोयी सुविधांसाठी विविध विकासकामे करणे.एसजे-२, पान क्र.२४०, अ.क्र.१३६,प्रभाग क्र.३४ब, ई-लर्निंग स्कुलचे अपूर्ण काम पूर्ण करणे. | ३० लाख | --- |
| शहरामध्ये क्रीडासंकुल, स्टेडियम,क्रीडांगणे बांधणे, मैदाने विकसित करणे व विविध विकास कामे करणे. एसजे-२४, पान क्र.२६५, अ.क्र.८७ प्रभाग क्र.३४ब,मध्ये क्रीडा संकुल उभारणे. | ३० लाख | --- |
| शहरामध्ये सांस्कृतिक भवन, नाट्यगृह,कलादालन बांधणे स्मारक उभारणे व विविध विकास कामे करणे.यादी क्र.एसजे१६, पान क्र.२६७, अ.क्र.१४, प्रभाग क्र.३४ब, बालशिवाजी नाटयगृहाचे अपूर्ण काम पूर्ण करणे. | ३० लाख | --- |
| **नवीन सुचविलेली कामे-** | | |
| १) प्रभाग क्र.३४ब, विविध ठिकाणी स्मार्ट बस स्टॉप विकसित करणे. | --- | २० लाख |
| २) प्रभाग क्र.३४ब, मध्ये विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे. | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र.३४ब, मधील आनंदनगर मारूती मंदिर येथे विविध ठिकाणी विकास कामे करणे.( भाग १ ) | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र.३४ब, मधील आनंदनगर मारूती मंदिर येथे विविध ठिकाणी विकास कामे करणे.( भाग २ ) | --- | १० लाख |

| | | |
|---|---|---|
| ५) प्रभाग क्र.३४ब, मध्ये विविध ठिकाणी रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | --- | १० लाख |
| ६) प्रभाग क्र.३४ब, मध्ये सनसिटी भागातील रस्ते डांबरीकरण करणे. | --- | १० लाख |
| ७) प्रभाग क्र.३४ब,मध्ये सनसिटी भागातील रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | --- | १० लाख |
| ८) प्रभाग क्र.३४ब, मध्ये विविध ठिकाणी इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. ९६३**

मा.वसंत मोरे यांचे दि. १८/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.४० ड मध्ये पुण्यश्लोक राजमाता आहिल्यादेवी होळकर उद्यान मोरे बागेत मजूर पुरविणेसाठी र.रु.१० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक पान क्र.२५५, अ.क्र.३७७, बजेट कोडः- सीई२२अे५४८/एसजे१०-११७६, प्रभाग ४० ड मधील विविध ठिकाणच्या उद्यानात बसण्यासाठी बाकडी बसविणे. | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र.४० ड मध्ये पुण्यश्लोक राजमाता आहिल्यादेवी होळकर उद्यान मोरे बागेत मजूर पुरविणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर सदर ठरावाची कार्यवाही मा.महा.आयुक्त यांनी करावी.

**विषय क्र. ९६४**

मा.सौ.अर्चना पाटील व मा.राहुल भंडारे यांचे दि.१८/८/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेतील शिक्षण मंडळ अंतर्गत कार्यरत असणाऱ्या बालवाडी शिक्षिका व सेविका यांना मासिक मानधन हे शिक्षकांसाठी ८५००/- सेविकांसाठी ६,२००/- इतके मानधन सद्य स्थितीत पुणे मनपा शिक्षण मंडळतर्फे त्यांना देण्यात येते. परंतू सदरचे मिळणारे मानधन हे अगदी तुटपुंज स्वरुपाचे आहे. तसेच हे वाढत्या महागाईला न परवडणारे आहे. तसेच २०१६ पासून या मानधनामध्ये कोणत्याही स्वरुपाची वाढ झालेली नाही. इतर महानगरपालिकेच्या मानाने पुणे मनपा देत असलेले मानधन हे अतिशय कमी आहे. या मानधनामध्ये ते स्वत: व त्यांच्या कुटूंबियांच्या प्राथमिक गरजा देखील पुर्ण करणेस अडचण निर्माण होत आहे. तसेच या शिक्षिका व सेविकांना कोणत्या वैद्यकीय रजा व प्रसुती रजा मिळत नाही.

तरी वरील परिस्थितीवर गांभीर्याने विचार करुन पुणे महानगरपालिकेतील शिक्षण मंडळ अंतर्गत कार्यरत असलेल्या बालवाडी शिक्षिका व बालवाडी सेविकांना न्याय देऊन योग्य ती मानधन वाढ देण्यात यावी व त्यांच्या मानधनामध्ये दरवर्षी १०% प्रमाणे वाढ देण्यात यावे तसेच वैद्यकिय सेवा व ६ महिन्यांची प्रसुती रजा देण्यात यावी.

**विषय क्र. ९६५**

मा.बाळा ओसवाल व मा.सौ.श्वेता चव्हाण यांचे दि.१८/८/२०१८ चे पत्र.

पुणे स्टेशन ते पंडीत जवाहलाल नेहरू रोड मार्गे मार्केट यार्ड चौक ते अप्पर इंदिरानगर ते कात्रज या ठिकाणी मेट्रो रेल योजना राबवावी. ती राबविल्यास या रस्त्यावरील वाहतुकीचे प्रमाण कमी होईल. त्यामुळे पुणे शहरातील प्रर्दुषण कमी होण्यास मदत होईल. याकरीता मेट्रो रेल सुरू करण्यास परवानगी देऊन त्याचा डी.पी.आर. तयार करावा.

... मार्ग खालील प्रमाणे असावा...

पुणे स्टेशन ते--- पंडीत जवाहलाल नेहरू रोड मार्गे - -- मार्केट यार्ड चौक---
मार्केट यार्ड ते --- गंगाधाम सोसायटी मार्गे---- अप्पर इंदिरानगर(व्ही.आय.टी हॉस्टेल चौक)---
अप्पर इंदिरानगर ते--- ---कोंढवा मार्गे --- शत्रुंजय मंदिर चौक----
शत्रुंजय मंदिर चौक ते ---- कोंढवा कात्रज रोड मार्गे--- कात्रज मेट्रो स्टेशन.

**विषय क्र. ९६६**

मा.सौ.मनिषा राजाभाऊ कदम यांचे दि.२०/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ३८ क येथील स.नं. ६५९ राजीव गांधीनगर येथे सिमाभिंत बांधणेसाठी र.रु.१० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक, बजेट कोड : CE२२A७०४/SJ२०-२४०, पान क्र. २६०, अनु.क्र. १४०, प्रभाग क्र. ३८ क मधील विविध ठिकाणी ज्येष्ठ नागरिक विरंगुळा कट्टा उभारणे | १० लाख | --- |
| **नवीन सुचविलेले काम**<br>प्रभाग क्र. ३८ क येथील स.नं. ६५९ राजीव गांधीनगर येथे सिमाभिंत बांधणे. | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. ९६७**

मा.रफिक शेख यांचे दि.२०/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १९ ड मध्ये खालील विविध विकासकामे करणेसाठी र.रु.३५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक,<br>१) शहरामध्ये शौचालये / मुताऱ्या बांधणे , पान क्र.२८०, अ.क्र.१०८, ( यादी क्र.एसजी२) प्रभाग क्र.१९ड,मधील चुडामण तालीम मदिला हॉटेलच्या पाठीमागील शौचालयाची दुरूस्ती करणे व तदनुषंगिक कामे करणे. | १० लाख | --- |
| २) शहरामध्ये पाण्याच्या लाईन टाकणे, पान क्र.३८,अ.क्र.१५९, (यादी क्र.एसपी२) प्रभाग क्र.१९ ड, मधील हरकानगर येथे पाणीपुरवठा विषयक कामे करणे. | १० लाख | --- |
| ३) शहरामध्ये मलवाहिन्या विकसित करणे, पान क्र.५८,अ.क्र.५०१, (यादी क्र.एसडी२) प्रभाग क्र.१९ड, मधील गुरूनानक नगर येथे ड्रेनेज लाईन करणे | १५ लाख | --- |
| नवीन सुचविलेली कामे- | | |
| १) प्रभाग क्र.१९ड, मध्ये विविध ठिकाणी फुटपाथ करणे. | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र.१९ड, मधील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन मधील गाळ काढणे व चेंबर दुरूस्ती करणे. | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र.१९ड, मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व कॉक्रीटीकरण करणे | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र.१९ड, मधील चेंबरची दुरूस्ती करणे व नवीन बांधणे | --- | ५ लाख |

( मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी. )

**विषय क्र. ९६८**

मा.रफिक शेख यांचे दि.२०/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १९ ड मध्ये खालील विविध विकासकामे करणेसाठी र.रु.४० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक,<br>१) शहरातील रस्ते डांबरीकरण करणे, पान क्र.१६६,अ.क्र.३१० ( यादी क्र.एसए२) प्रभाग क्र.१९ड, मधील चुडामण तालीम येथील रस्ते डांबरीकरण करणे. | १० लाख | --- |
| २) Pedestrian Policy नुसार शहरातील फुटपाथ विकसित करणे. पान क्र.१७९,अ.क्र.१४४ ( यादी क्र.एसए१३) प्रभाग क्र.१९ड, मधील मटण मार्केट येथील फुटपाथ करणे. | १० लाख | --- |
| ३) शहरातील रस्ते कॉक्रीटने विकसित करणे , पान क्र.२००, अ.क्र.४२६( यादी क्र.एसए१५) प्रभाग क्र.१९ड मधील बाफना रोड येथे ट्रिमिक्स कॉक्रिट करणे. | १० लाख | --- |
| ४) शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, पान क्र.२७४,अ.क्र.९८ ( यादी क्र.एसयु१) प्रभाग क्र.१९ड, मधील विविध उद्यानामध्ये विकासाची कामे करणे. | १० लाख | --- |
| **नवीन सुचविलेली कामे-** | | |
| **१)** प्रभाग क्र.१९ड, मध्ये विविध ठिकाणी थर्मोप्लास्टिक पट्टे मारणे | --- | १० लाख |
| **२)** प्रभाग क्र.१९ड, मध्ये साईन बोर्ड व वाहतूक विषयक कामे करणे. | --- | १० लाख |

| | | |
|---|---|---|
| ३) प्रभाग क्र.१९ड, मध्ये विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे. | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र.१९ड, मध्ये लोखंडी बेचेंस बसविणे | --- | १० लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**विषय क्र. ९६९**

मा.सम्राट थोरात यांचे दि.२०/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १८ ड मध्ये खालील विविध विकासकामे करणेसाठी र.रु.२५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक,<br>१) बजेट कोड नं.सीई २० अे १०२/एसअे १२९७, प्रभाग क्र. १८ ड मध्ये गुरुवार पेठ रविवारपेठ डांबरीकरण करणे. | १५ लाख | --- |
| २) बजेट कोड नं.सीई २० अे १०२/एसअे १२९९, प्रभाग क्र. १८ ड मध्ये दलाल चौक ते सुवर्ण भारत मंडल परिसरामध्ये डांबरीकरण करणे | १० लाख | --- |
| नवीन सुचविलेली कामे- | | |
| १) प्रभाग क्र.१८ ड मध्ये घसेटी पूल येथे म्यूलर पध्दतीने भिंत सुशोभित करणे | --- | ९ लाख |
| २) प्रभाग क्र.१८ ड मध्ये म्यूलर पध्दतीने भिंत सुशोभित करणे | --- | ६ लाख |
| ३) प्रभाग क्र.१८ ड मध्ये चौक सुशोभित करणे | --- | १० लाख |

**विषय क्र. ९७०**

मा.किरण दगडेपाटील यांचे दि.२०/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १० अ कोथरुड-बावधन येथील पदपथ विकसित करणेसाठी र.रु.१० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक, बजेट कोड - सीई२०बी१०२/एसटी२-२२५, प्रभाग क्र. १० अ मध्ये बावधन भुसारी कॉलनी व इतरत्र थर्मोप्लास्टिक व झेब्रा क्रॉसिंग पट्टे मारणे | १० लाख | --- |
| **<u>नवीन सुचविलेले काम</u>**<br>प्रभाग क्र. १० अ कोथरुड-बावधन येथील पदपथ विकसित करणे | --- | १० लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**विषय क्र. ९७१**

मा.अजय खेडेकर व मा.उमेश गायकवाड यांचे दि.२०/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १८ क मध्ये खालील विविध विकासकामे करणेसाठी र.रु.३० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, बजेटकोड क्र.CE22A548/SJ10-928, शहरामध्ये विविध ठिकाणी सिमाभिंत बांधणे, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे.(यादी क्र.SJ10) प्रभाग क्र.१२क, कर्वेरस्ता ,डहाणूकर कॉलनी,कोथरूड गाव, भेलकेनगर,गणंजय सोसायटी येथील बसथांबे नव्याने उभे करणे. | ३० लाख | --- |
| **नवीन सुचविलेली कामे-** | | |
| १) प्रभाग क्र.१८क, मध्ये ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र.१८क, मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र.१८क, मधील उद्यानामध्ये विविध विकास कामे करणे. | --- | १० लाख |

**विषय क्र. ९७२**

मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे, उपमहापौर यांचे दि.२१/८/२०१८ चे पत्र.

नव्याने समाविष्ठ लोहगांव, धानोरी या परिसरातील महत्वाचे ड्रेनेज विकसित करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक, पान क्र.१९२, अ.क्र.४२, प्रभाग क्र. २ अ मधील टिंगरेनगर रोड नं. १ मधील रस्ता यु.टी.डब्ल्यु.टी. पध्दतीने विकसित करणे | २० लाख | --- |
| **नवीन सुचविलेले काम** | | |
| नव्याने समाविष्ठ लोहगांव, धानोरी या परिसरातील महत्वाचे ड्रेनेज विकसित करणे | --- | २० लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**विषय क्र. ९७३**

मा.सौ.ज्योती कळमकर यांचे दि.२१/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ९ ब मध्ये बाणेर-म्हाळूंगे रोड, सर्व्हे नं. ११८/३ वर्षा गार्डनच्या बाजुच्या लेनमध्ये पाण्याची लाईन टाकणेसाठी र.रु.१० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक, सीई२०बी१०१/एसटी१-१६३, प्रभाग क्र.९ ब, मध्ये डिजिटल कार्बन करुन चौक सुशोभिकरण करणे | १० लाख | --- |
| **नवीन सुचविलेले काम** | | |
| प्रभाग क्र. ९ ब मध्ये बाणेर-म्हाळूंगे रोड, सर्व्हे नं. ११८/३ वर्षा गार्डनच्या बाजुच्या लेनमध्ये पाण्याची लाईन टाकणे | --- | १० लाख |

**विषय क्र. ९७४**

मा.सौ.ज्योती कळमकर यांचे दि.२१/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ९ ब मध्ये सर्व्हे नं. २८४/१अ/२, २८४/१अ/३, २८४/१अ/४, पल्लोड फॉर्म, बाणेर येथे हास्यक्लब बांधणे क्षेत्र ७७३.७७ चौ.मी.साठी र.रु.१० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक, सीई२२अे५४८/एसजे१०-८९३, प्रभाग क्र.९ ब, मध्ये हास्यक्लब करणे | १० लाख | --- |
| **नवीन सुचविलेले काम** | | |
| प्रभाग क्र. ९ ब मध्ये सर्व्हे नं. २८४/१अ/२, २८४/१अ/३, २८४/१अ/४, पल्लोड फॉर्म, बाणेर येथे हास्यक्लब बांधणे क्षेत्र ७७३.७७ चौ.मी. | --- | १० लाख |

**विषय क्र. ९७५**

मा.सौ.वर्षा साठे यांचे दि.२१/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ३७ अ मध्ये खालील विविध विकासकामे करणेसाठी र.रु.५५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक,<br>१) सीई२०अे१२६२/एसए१५-२२७१, प्रभाग क्र.३७ अ मधील पद्मावती नगर परिसरातील रस्ता यु.टी.डब्ल्यु.टी. पध्दतीने विकसित करणे. | १५ लाख | --- |
| २) सीई२०अे१२६२/एसए१५-२२७३, प्रभाग क्र.३७ अ मधील खडके वस्तीकडे जाणारा रस्ता यु.टी.डब्ल्यु.टी. पध्दतीने कॉंक्रीटीकरण करणे. | १५ लाख | --- |
| ३) सीई२०अे१२६२/एसए१५-२२७५, प्रभाग क्र.३७ अ मधील अंबिकानगर ते जगताप डेअरीकडे जाणारा रस्ता यु.टी.डब्ल्यु.टी. पध्दतीने कॉंक्रीटीकरण करणे. | १५ लाख | --- |
| ४) सीई२०अे१२६२/एसए१५-२२८३, प्रभाग क्र.३७ अ मधील स.नं. ६५०/२/१ जग्देनगर मध्ये यु.टी.डब्ल्यु.टी. पध्दतीने कॉंक्रीटीकरण करणे. | १० लाख | --- |
| नवीन सुचविलेली कामे- | | |
| १) प्रभाग क्र.३७ अ मधील दुर्गामाता गार्डनमध्ये विद्युतविषयक कामे करणे | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र.३७ अ मध्ये विविध चौक व सार्वजनिक ठिकाणी सी.सी.टि.व्ही.कॅमेरे बसविणे | --- | २० लाख |
| ३) प्रभाग क्र.३७ अ मधील विविध कमानी दुरुस्ती करुन रंगरंगोटी करणे | --- | १० लाख |
| ४)प्रभाग क्र.३७अ मधील आंबेडकर उद्यान येथे स्थापत्य विषयक सुधारणा कामे करणे | --- | १५ लाख |

**विषय क्र. ९७६**

मा.सौ.वैशाली बनकर यांचे दि.२१/८/२०१८ चे पत्र.

गुंठेवारी मध्ये ज्यांनी घरे बांधली आहेत व ज्यांनी फोर व्हिलर गाडीसाठी पार्कीगची सोय केली आहे त्या घर मालकास मिळकत करामध्ये ५ टक्के सवलत देण्यात यावी. जेणेकरुन नागरिक त्यांच्या गाडया रोडवर पार्क करतात ते घराच्या पार्कींगमध्ये गाडया लावतील.

तरी त्यांना मिळकत करामध्ये ५ टक्के सवलत देण्यात यावी.

**विषय क्र. ९७७**

मा.अविनाश बागवे व मा.रफिक शेख यांचे दि.२१/८/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या सर्व स्थापत्य विभागांची दरपत्रक ठरविताना राज्य शासनाच्या जी.आर.नं. परिपत्रक क्र.२०१७/प्र.क्र.२७४ दि.२ जानेवारी २०१८ च्या अध्यादेशानुसार सुधारित दरपत्रक व जाचक अटी-शर्ती समाविष्ट करण्याची प्रक्रिया सुरू केल्याचे निदर्शनास येत आहे. मनपा अर्थसंकल्पीय तरतूदीतून विकासकामे करणारे ठेकेदार यांच्यातील वितुष्ट टोकास गेले असल्याने प्रशासनाने जाणीवपूर्वक स्थानिक भूमीपुत्र असणा-या ठेकेदारावर कुरघोडी करण्याच्या हेतूने अत्यंत जाचक अटी निविदा प्रक्रियेत समाविष्ट केल्या आहेत.

पुणे महानगरपालिका परिक्षेत्रात उपलब्ध कच्च्या मालाचा मुळ दर, शासकीय कर, ठेकेदार नफा, रॉयल्टी, लेबर, तदनुषंगिक खर्च व ठेकेदारांची गुंतवणूक इत्यादी बाबींचा विचार करून शास्त्रशुध्द पध्दतीने मनपाचे दरपत्रक बनविणे आत्यंतिक गरजेचे आहे. पुणे मनपा स्वायत्त संस्था असून राज्य शासनाच्या दरपत्रकानुसार स्मार्ट सिटी अनुसरून दर्जास अनुरूप कामे होणे अशक्य आहे. दरपत्रक प्रसिध्द करणेपूर्वी मनपाच्या दक्षता विभागाने प्रकाशित दरपत्रकानुसार काम करणे शक्य नाही हे सिध्द होत आहे.

पुणे मनपाचे स्वतंत्र दरपत्रक बनवून विकासकामे करणेसाठी राज्य शासनाची परवागनी घेण्यात यावी याबाबत तातडीने कार्यवाही सुरू करण्यात यावी. तसेच सुधारित निविदा अटी व शर्तींच्या आधारे टेंडर प्रक्रिया राबविल्यास ९५ टक्के ठेकेदार टेंडर प्रक्रियेपासून वंचित होणार आहे. मूठभर ठेकेदारांने प्रशासनातील अधिका-यांना हाताशी धरून राज्य शासनही लागू करत नसलेल्या अटी व शर्ती लागू करून स्थानिक ठेकेदारांना टेंडर प्रक्रियेपासून वंचित ठेवण्याच्या प्रयत्नात आहेत.

याबाबत खालील नमूद निविदा अटी शर्ती बाबत प्रशासनाने पुर्नविचार करावा.

१.राज्यातील कोणत्याही महानगरपालिका, अगर शासकीय विभागाकडे निविदा प्रक्रियेत अनामत रक्कम ठेवण्याचा कालावधी हा १ वर्षाचा आहे. परंतु मनपाने नवीन सुधारित अटी शर्तीमध्ये हा कालावधी २ वर्षे १ महिने असा केलेला आहे.

२.कोणत्याही शासकीय निविदा प्रक्रियेत अतिरिक्त सिक्युरिटी डिपॉझिट कापण्यात येत नाही. परंतू नवीन निविदा अटी शर्तीनुसार पुणे मनपा ५ टक्के अतिरिक्त सिक्युरिटी डिपॉझिट कापणार आहे. ही बाब अगम्य हेतूने ठेकेदारांची जास्तीत जास्त आर्थिक कोंडी करण्याच्या हेतूने व सर्वसामान्य ठेकेदारांना स्पर्धात्मक टेंडर प्रक्रियेतून बाद करणेसाठी लागू करण्यात आले आहे.

३.परफॉर्मन्स गॅरंटी ही बाब टेंडर कामकाज नियमावलीनुसार काम विहित मुदतीत व्हावे म्हणून लागू करण्यात येते. अन्यत्र राज्य शासनाच्या स्थापत्य विभागात परफॉर्मन्स गॅरंटी हा प्रकारच अस्तित्वात नाही. सदर परफॉर्मन्स गॅरंटी काम झाल्यानंतर तातडीने अंतिम बिलाच्या वेळेस ठेकेदारास देण्यात येत होती. सदर परफॉर्मन्स गॅरंटी ही मोठया रकमेच्या म्हणजेच ५ कोटीच्या पुढील निविदांना लागू आहे. सदर निविदा कामांची मुदत प्रदीर्घ काळ असते. निविदा अटी शर्तीनुसार एफडीआर ऐवजी डीडी जोडण्याची अट लागू केलेली आहे. पूर्वावत एफडीआर स्वरूपात परफॉर्मन्स गॅरंटी स्विकारण्यास सुरू केल्यास ठेकेदार/मनपास व्याज मिळू शकणार आहे.

४.नवीन निविदा अटी शर्तीनुसार प्रशासनाने विशेष भाववाढ सूत्रांतर्गत कामाचा लागू केलेला कालावधी हा सरसकट सर्व कामांना लागू करण्यात यावा.

५.शासकीय कामाप्रमाणे मनपाच्या कामांना आर्बिट्रेशन क्लॉज लागू करावा. जेणेकरून निविदा कामे न रखडता विहित कालावधीमध्ये होतील.

मुददा क्र.१ ते ५ यांचा वस्तुस्थितीजन्य अभ्यास करून अकारण मनपाकडे वर्षानुवर्षे काम करणा-या ठेकेदारांना टेंडर प्रक्रियेतून बाद करण्याची कार्यवाही रद्दबातल करण्यात यावी.

पुणे मनपाकडील असलेल्या ठेकेदारांपैकी ९० टक्के ठेकेदार हे प्रशासनाच्या सोयीनुसार पुणे मनपास घरची संस्था मानून प्रसंगी खिशास झळ पोहोचली तरी प्रामाणिकपणे कामात मदत करीत असतात. सर्व विभागाचे अधिकारी व ठेकेदारांचे प्रतिनिधी यांच्या समन्वयाने कायदेशीररित्या वैध असलेल्या अटी शर्तींचा निविदा प्रक्रियेत समावेश करणेसाठी उपाय योजना करण्यात याव्यात. शेकडो कोटी रूपयांच्या निविदा प्रक्रिया स्मार्ट सिटी, मेट्रो प्रकल्प अनुषंगाने मनपा जुन्या व सुधारित हद्दीत होणार आहे. स्थानिक ठेकेदार या निविदा प्रक्रियेत पात्र होण्यासाठी प्रशासनाने सुयोग्य धोरण राबवावे.

**विषय क्र. ९७८**

मा.आबा बागुल यांचे दि.२१/८/२०१८ चे पत्र.

मा.स्थायी समिती कार्यपत्रिका क्र.१८ विषय क्र.७३४ दि.३१.७.२०१८ हा विषय खास सभेकडे वर्ग केला असून या विषयाचा खालीलप्रमाणे फेरविचार करण्यात यावा.

पुणे शहरातील समाविष्ट गावांतील रस्ते अरूंद असल्याने वाहतूकीची समस्या अत्यंत जटील झालेली आहे. यामुळे अनेकवेळा अपघात घडून शेकडो नागरिकांना जीव गमवावा लागला आहे. यावर उपाय म्हणून पुणे शहरातील समाविष्ट गावांतील प्रमुख रस्त्यांची रूंदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० (१)(ब) अन्वये वाढविणेसाठी वेळोवळी तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांच्या दालनामध्ये व मा.मुख्य सभेत चर्चा झाली असून रस्ते रूंद करणेबाबत सकारात्मक भूमिका आहे. तसेच विद्यमान मा.मुख्यमंत्री महोदयांनी देखील याविषयी पत्रव्यवहार व चर्चा झाली असून त्यांनी देखील सकारात्मक भूमिका घेतली असून कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासनाकडून पुणे महानगरपालिकेस पत्रव्यवहार देखील केला आहे. आता पुणे शहराचा विकास आराखडा देखील मान्य झाला आहे. या समाविष्ट गावांमध्ये मोठया प्रमाणात बांधकामे होवून मोठया प्रमाणात लोकवस्ती तयार झाली आहे. या गावांमधील प्रमुख रस्ते अरूंद आहेत. सबब याप्रकरणी स्थायी समितीकडे पूर्वीच प्रमुख रस्त्यांची रूंदी करणेसाठी ठराव दिला असून या ठरावास पुणे महानगरपालिका प्रशासनाचा अभिप्राय देखील सकारात्मक आलेला आहे. भविष्यात होणारी जिवित हानी टाळण्यासाठी पुणे शहरातील समाविष्ट गावांतील प्रमुख रस्त्यांची रूंदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० (१)(ब) अन्वये वाढविणे अत्यंत गरजेचे आहे.

सबब यापूर्वीच प्रशासनाने सकारात्मक अभिप्राय दिला असून मा.स्थायी समितीमध्ये सकारात्मक अभिप्रायाचा फेर अभिप्राय घेण्याचा निर्णय झाला आहे. तरी आमची मा.स्थायी समितीकडे विनंती आहे की, पुणे शहरातील समाविष्ट गावांतील प्रमुख रस्त्यांची रूंदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० (१) (ब) अन्वये वाढविणेबाबत मा.स्थायी समिती ठ.क्र.२७ दि.३.४.२०१२ चा फेरविचार करून प्रशासनाच्या अभिप्रायासह विषय मान्य करण्यात यावा.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. ९७९**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र.१) पुणे महानगरपालिका यांच्या अंतर्गत येणाऱ्या कामांच्या १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०१८ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ–१/४१० दि.२१/८/२०१८ चे पत्र.

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. ९८०**

प्रभाग क्र. २८ ब संदेशनगर मनपा शाळा क्र.१०५ व ६६ मुला मुलींची येथे शाळेतील उर्वरित विकास कामे करणे व सुशोभिकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.वेदांत एन्टरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५७,५४,७२९/– पेक्षा २२.९९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४४,३१,१४७=०८ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत होऊन टेंडर अटी शर्तीनुसार काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/भवन/४०९ दि. १८/८/२०१८ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. ९८१**

श्री.रमेश शंकरराव पांढरे व अशोक बबनराव पांढरे यांना पुणे पेठ शिवाजीनगर सि.स.नं. १२६३/१ फा.प्लॉट नं. ५९३/१ येथील ३० मी.डी.पी. रोडसाठी रस्तारुंदी बाधित ७५.२५ चौ.मी. क्षेत्राची रोख नुकसान भरपाई देणेसाठी सन २०१७ चे शीघ्रसिध्दगणकाप्रमाणे मुल्यांकन र.रुपये ५३,९३,९२०/– + दिलासा र.रुपये १६,१८,१७६/– असे एकुण मोबदला र.रुपये ७०,१२,०९६/– यांना भूसंपादन व व्यवस्थापन खात्याकडील FE11A102 चे अंदाजपत्रकीय अर्थशिर्षक व खर्ची टाकणेस व प्रॉपर्टी कार्डावर पुणे महानगरपालिकेच्या नावाची नोंद झालेनंतर संबंधिताना देणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/३१८ दि.३०/७/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.१४/८/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. ९८२**

१) शहरी गरीब वैद्यकीय सहाय योजनेतील रक्कम रुपये १,००,०००/-ची मर्यादा रक्कम रुपये२,००,०००/- वाढविणेबाबत-

सदर विषयाबाबत संदर्भ क्रमांक ४ अन्वये, यापूर्वीच मा. महानगरपालिका सभेने शहरी गरीब वैद्यकीय योजनेअंतर्गत किडनीविकार,हदयरोग व कर्करोग या तीन आजारांसाठी पॅनेलवरील प्रायव्हेट हॉस्पिटल्समधील वैद्यकीय उपचारांसाठी रक्कम रूपये २,००,०००/- या कमाल मर्यादेपर्यंत सी.जी.एच.एस. मान्य दराने नियमानुसार हमीपत्रांतर्गत आर्थिक लाभ देणेबाबत ठराव पारित केला आहे.

२) वय वर्षे ६० पेक्षा जास्त वय असलेल्या ज्येष्ठ नागरीकांना त्यांचे वयामुळे शहरी गरीब योजनेचा लाभ घेताना उत्पन्नाचा दाखला सादर करणे अडचणीचे ठरत असलेकारणाने वय वर्षे ६० पेक्षा जास्त वय असलेल्या निराधार ज्येष्ठ नागरीकांना उत्पन्न दाखल्याची अट वगळण्यात यावी-

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत वास्तव्यास असणाऱ्या नागरीकांसाठी, शहरी गरीब वैद्यकीय सहाय योजनेअंतर्गत (अ) पिवळे शिधापत्रिका धारक (ब) गलिच्छ वस्ती निर्मुलन विभागाकडील सेवाकर पावती (क) मा. तहसीलदार कार्यालयाकडील चालू आर्थिक वर्षाचा रक्कम रूपये १,००,०००/- चे आतील उत्पन्न दाखला या तीन परस्पर पूरक कागदपत्रांपैकी एक कागदपत्र इतर आवश्यक कागदपत्रांसोबत सादर केल्यास, सभासदत्व देण्यात येते. म्हणजेच, पिवळी शिधापत्रिका अथवा गलिच्छ वस्ती निर्मुलन विभागाकडील सेवाकर पावती नसणाऱ्या नागरीकांसाठी मा. तहसीलदार कार्यालयाकडील उत्पन्न दाखला सादर करणे बंधनकारक आहे. परंतु, सदर उत्पन्न दाखला संबंधित कार्यालयाकडून प्राप्त करून घेणेसाठी सादर करावी लागणारी आवश्यक कागदपत्रे व त्यासाठी लागणारा कालावधी या दोहोंबाबत ज्येष्ठ नागरीकांना त्यांचे वयामुळे अडचण निर्माण होते.

यास्तव, पिवळे रेशनिंग कार्ड अथवा गलिच्छ वस्ती निर्मुलन विभागाकडील सेवाकर पावती धारक नसणाऱ्या, पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत वास्तव्यास असणाऱ्या, वय वर्षे ६० पूर्ण झालेल्या, निराधार ज्येष्ठ नागरीकांसाठी, शहरी गरीब वैद्यकीय सहाय योजनेचे सभासदत्व घेणेसाठी, मा. तहसीलदार कार्यालयाकडील उत्पन्न दाखला सादर करणेची अट, शिथिल करणेस शिफारस आहे. यास्तव, संबंधित ज्येष्ठ नागरीकांनी, शहरी गरीब योजनेच्या सभासद नोंदणी फॉर्म सोबत खाली नमूद केलेली कागदपत्रे सादर करून, सभासदत्व वर्गणी अदा करणे आवश्यक राहील.

१) ज्येष्ठ नागरीक (पती/पत्नी) यांचे आधारकार्ड छायांकित प्रत अथवा वयाचे दाखल्याची छायांकित प्रत.

२) फक्त ज्येष्ठ नागरीकांची नावे समाविष्ट असलेली आणि रक्कम रुपये १,००,०००/- चे आतील उत्पन्नाची नोंद असलेली स्वतंत्र शिधापत्रिकेची छायांकित प्रत.

३) व्हिजीटींग कार्ड आकाराचे एकत्रित फोटो -२ प्रती.

४) नोंदणी फी रक्कम रूपये १००/- व वार्षिक शुल्क रक्कम रुपये १००/- असे एकूण रक्कम रूपये २००/- रोख.

यानुरूप, शहरी गरीब वैद्यकीय सहाय योजनेचे सभासदत्वासाठी, मा.तहसीलदार कार्यालया कडील उत्पन्न दाखला सादर करणेची अट शिथिल करणेत आल्यास, योजनेचे सभासदत्वांतर्गत, वैद्यकीय उपचारांमध्ये आर्थिक लाभास पात्र होणाऱ्या ज्येष्ठ नागरीकांची संख्या वाढून एकूण योजनेच्या सभासद संख्येमध्येही वाढ होणार आहे. यास्तव, योजनेचे तरतूदीमध्ये भरीव वाढ करणे आवश्यक राहील.

याशिवाय, शहरातील विना अनुदानित वृध्दाश्रम अगर तत्सम संस्थेमध्ये वास्तव्यास असणाऱ्या निराधार ज्येष्ठ नागरीकांना वृध्दाश्रमामार्फत खाजगी रुग्णालयांतील अंतर्रुग्ण विभागातील वैद्यकीय उपचारांची सुविधा बहुतांश वेळेस उपलब्ध नसते. वृध्दाश्रमातील निराधार ज्येष्ठ नागरीकांसाठी शहरी गरीब वैद्यकीय सहाय योजनेअंतर्गत खाजगी रूग्णालयांमधील वैद्यकीय उपचारांमध्ये नियमानुसार आर्थिक लाभ देणे शक्य असून, सभासदत्वासाठी सभासद नोंदणी फॉर्मसोबत खाली नमूद केलेली कागदपत्रे सादर करून सभासदत्व वर्गणी अदा करणे आवश्यक राहील.

१) ज्येष्ठ नागरीक (पती/पत्नी) यांचे आधारकार्ड छायांकित प्रत अथवा वयाचे दाखल्याची छायांकित प्रत

२) वृध्दाश्रम अगर तत्सम संस्थेमार्फत, संबंधित ज्येष्ठ नागरीक निराधार असलेमुळे त्यांचेकडे वास्तव्यास असले बाबतचे नोंदणी प्रमाणपत्र व आवश्यकतेनुसार इतर कायदेशीर कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

३) वृध्दाश्रम अगर तत्सम संस्थेमार्फत, त्यांचेकडील ज्येष्ठ नागरीकांना, खाजगी रुग्णालयांमधील वैद्यकीय उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत नसलेबाबत नोटराईज्ड ॲफेडेव्हिट.

४) व्हिजीटींग कार्ड आकाराचे एकत्रित फोटो -२ प्रती

५) नोंदणी फी रक्कम रूपये १००/- व वार्षिक शुल्क रक्कम रुपये १००/- असे एकूण रक्कम रूपये २००/- रोख.

शहरातील ज्या वृध्दाश्रम अगर तत्सम संस्थेमध्ये वास्तव्यास असणाऱ्या ज्येष्ठ नागरीकांना, वृध्दाश्रम अगर तत्सम संस्थेमार्फत, खाजगी रुग्णालयांतील अंर्तरुग्ण विभागातील वैद्यकीय उपचारांची सुविधा उपलब्ध असल्यास, अशा वृध्दांसाठी शहरी गरीब वैद्यकीय सहाय योजनेचे सभासदत्वांतर्गत वैद्यकीय उपचारांमध्ये आर्थिक लाभ देणे शक्य नाही.

३)पुणे महानगरपालिकेच्या हददीतील अनाथ मुलांना शहरी गरीब योजनेअंतर्गत समाविष्ट करून सभासदत्वासाठी उत्पन्न दाखल्याची अट वगळण्यात यावी–

शहरी गरीब वैद्यकीय सहाय योजनेअंतर्गत, पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील अनाथ मुलांना समाविष्ट करून सभासदत्व देणेस खाली नमूद केलेली वयोमर्यादा, सभासद नोंदणी फॉर्म सोबत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता आणि सभासदत्व वर्गणी अदा करण्यात आल्यास, योजनेचे सभासदत्वासाठी उत्पन्न दाखला सादर करणेची अट शिथिल करणेस शिफारस आहे. परंतु, शहरातील अनाथ मुलांना शहरी गरीब वैद्यकीय सहाय योजनेअंतर्गत समाविष्ट करणेसाठी योजनेचे तरतूदीमध्ये भरीव वाढ करणे आवश्यक राहील.

अ) अनाथ मुलांचे वय वर्षे २५ पेक्षा जास्त नसावे. यास्तव, वयाचे दाखल्याची छायांकित प्रत.
ब) अनाथाश्रम अगर तत्सम संस्थेकडून अनाथ मुलांचे पालकत्व त्यांचेकडे असलेबाबत नोंदणी प्रमाणपत्र व आवश्यकतेनुसार इतर कायदेशीर कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील. परंतु, अनाथाश्रमात वास्तव्यास नसणाऱ्या, शहरातील अनाथ मुलांना, शहरी गरीब वैद्यकीय सहाय योजनेचे सभासदत्वासाठीचे निकष ठरविणे आवश्यक राहील.
क) व्हिजीटींग कार्ड आकाराचे एकत्रित फोटो –२ प्रती.
ड) नोंदणी फी रक्कम रूपये १००/–व वार्षिक शुल्क रक्कम रुपये १००/–असे एकूण रक्कम रूपये २००/–रोख.

शहरी गरीब वैद्यकीय सहाय योजनेच्या आर्थिक तरतूदीमध्ये भरीव वाढ केल्यास उपरोक्त बाबींचा समावेश करून कार्यवाही करणे शक्य आहे अश्या आशयाचा मा.महापालिका आयुक्त यांनी जा.क्र. मआ/आरोग्य/३५८,दि.३.८.२०१८ चे पत्रान्वये पाठविलेला अभिप्रायावर झालेला महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र. ६० दि.८/८/२०१८ विचारासाठी.

**विषय क्र. ९८३**

पुणे महानगरपालिकेच्या विविध इमारतींवर सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड यांनी शासकीय इमारतींवर रुफ टॉप सोलर सिस्टीम बसविणेसाठी काढलेल्या SECI/C&P/MNRE/1000/MWRT/IND/122016 या टेंडर नुसार यशस्वी कंपन्यांकडून पुणे महानगरपालिकेच्या विविध इमारतींवर RESCO (Renewable Energy Service Companies) मॉडेल पध्दतीने ग्रीड कनेक्टेड रुफटॉप सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणेचे काम मे.टीईपी सोलर इंडिया मॉरिशस यांच्या वतीने मे.महाराष्ट्र रेस्को रुफ टॉप सोलर प्रा.लि. यांच्याकडुन करुन घेणेसाठी मे.महाराष्ट्र रेस्को रुफ टॉप सोलर प्रा.लि. यांना कार्यादेश देणेस, त्यांचेसोबत पॉवर पर्चेस ॲग्रीमेंट करणेस व प्रत्यक्ष वीजनिर्मितीनुसार र.रुपये ३.६२ प्रती युनिट या दराने बिल आदा करणेस मा.महापालिका आयुक्त यांच्या मान्यतेने कार्यवाही केल्याची बाब अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/४११ दि.२१/८/२०१८ चे पत्र

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**